RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा शैक्षणिक प्रगती व भौतिक सुविधा यांचा अभ्यास

**डॉ. कांबळे मोहन सखाराम**
आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय पुणे -०४
Email – drmohankamble@gmail.com

**ज्योत्स्ना मोहन कांबळे**
टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे-३०
Email - jotsnasonawane@gmail.com

**प्रस्तावना**– सामाजिक, आर्थिक व बौद्धिक विकासात शिक्षणाचा खूप मोठा वाटा आहे. सुसंस्कृत आणि मूल्याधिष्ठित समाजाचा शिक्षण हा पाया आहे. परिवर्तनाचे अथवा बदलाचे अतिशय महत्त्वाचे माध्यम म्हणजे शिक्षण होय. ‘‘ महात्मा गांधींजीनी शिक्षणाबद्दलचे विचार व्यक्त करताना असे म्हटले आहे की,माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगातील उत्कृष्ठतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण.’’ भविष्यकालीन भारतीय समाजाचे चित्र कसे असेल, आपल्या देशाला अनेक स्तरावर निरनिराळया समस्या भेडसावत आहेत. उदा. लोकसंख्या वाढ, दारिद्रय, रोजगार संधी इ.मात्र यासाठी व्यावसायिक शिक्षण घेवून बाहेर पडलेला विद्यार्थी समाजामध्ये त्याला नोकरी व्यावसायाची किती प्रमाणात संधी उपलब्ध होते,हे आपणासही माहिती आहे. व्यावसायिक शिक्षण घेवून बाहेर पडलेला विद्यार्थी तो राष्ट्राच्या विकासात किती योगदान देतो, त्यावरच व्यावसायिक शिक्षणाचे भवितव्य अवलंबून आहे त्यासाठी शिक्षकाने विद्यार्थ्यामध्ये उपक्रमशीलता, शोधकवृत्ती, निर्णयशक्ती, मानवीसंबंध इ. विकास करावयास पाहिजे. राष्टाचा दर्जा लोकांना दिलेल्या शिक्षणाच्या गनणवत्तेवर अवलंबून असतो. शिक्षक प्रशिक्षण, संशोधन यांच्या विकासाने आर्थिक विकासास चालना मिळते.काळाची गरज ओळखून देशाला संमृद्ध करायचे असल्यास सर्व स्तरावरील व्यावसायिक शिक्षण दर्जेदार स्वरूपाचे देणे आवश्यक आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या टप्प्यातील महत्त्वाचे असलेले शिक्षक शिक्षण यावरही अधिक प्रकाश टाकणे गरजेचे वाटते.

**शीर्षक** – शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा शैक्षणिक प्रगती व भौतिक सुविधा यांचा अभ्यास.

**शिक्षणशास्त्र महाविद्यालय** – बी.एड् महाविद्यालय

**शैक्षणिक प्रगती**– अभ्यासक्रम दृष्टिकोन,अध्ययन-अध्यापन मूल्यमापन, संशोधन सल्ला मार्गदर्शन व विस्तारसेवा इ. घटकातील धनात्मक बदल.

**भौतिक सुविधा**– मूलभुत सोयी सुविधा, इमारत, ग्रंथालय, अध्ययन साधने, व्यवस्थापन संघटन इ. घटकांचा अभ्यास.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**अभ्यास–** अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची व विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची शैक्षणिक प्रगती व भौतिक सुविधा यांची तुलना.

**गरज व महत्त्व –** शिक्षणशास्त्र महाविद्यालयात दिल्याजाण–या प्रशिक्षणचा दर्जा व गुणवत्ता आवश्यक आहे. सद्यस्थितीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडे विद्यार्थ्यांचा कल हा कमी होत असलेला दिसून येत आहे. त्यात चांगल्या प्रशिक्षण देणा–या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा प्रश्न मोठया प्रमाणात भेडसावत आहे. याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होवू लागला. वाढती शिक्षणशास्त्र महाविद्यालये व कमी विद्यार्थी संख्या यांचा मेळ घालणे अवघड झाले आहे. त्यात शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना उपलब्ध होणा–या भौतिक सुविधा या सर्वबाबींवर विद्यार्थ्यांची प्रगती अवलंबून असते त्यासाठी प्रस्तूत संशोधन गरज आहे.शिक्षणाचा संबंध राष्ट्रीय उत्पादनाशी जोडला गेला.यासाठी शिक्षक प्रशिक्षण व त्याच्या गुणवत्तेवर भर देणे आवश्यक आहे. ही गुणवत्ता फक्त महाविद्यालयांची संख्या वाढवून साध्य होणार नाही. उपलब्ध असलेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी व प्रगतीसाठी प्रयत्न केले पाहिजे. म्हणूनच सदर संशोधनाची आवश्यकता आहे.

**उद्‌दिष्टे –**

१. अनुदानित व विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा शैक्षणिक प्रगतीचा अभ्यास करणे
२. अनुदानित व विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा भौतिक सुविधांचा अभ्यास करणे
३. अनुदानित व विनाअनुदानित शक्षणशास्त्र महाविद्यालयांचा शैक्षणिक प्रगतीचा व भौतिक सुविधांचा तुलना करणे.

**मर्यादा**

प्रस्तूत संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतिसादकांच्या प्रतिसादावर अवलंबून आहेत.

**परिमर्यादा**

१. प्रस्तूत संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा शैक्षणिक प्रगती भौतिक सुविधां पुरतेच मर्यादित आहे.
२. प्रस्तूत संशोधन हे ४ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाशी संबंधित आहे.
३. प्रस्तूत संशोधनासाठी तयार केलेली प्रश्नावली ही संशोधक निर्मित आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तूत संशोधनासाठी सर्वेक्षण या संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**नमुना निवड–** प्रस्तूत संशोधनासाठी नमुना म्हणून ४ महाविद्यालयातील निवड करण्यात आली आहे.

**माहिती संकलनाची साधने–** माहिती संकलनासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला.

**संख्याशास्त्रीय साधने–** प्रस्तूत संशोधनासाठी शेकडेवारी या तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

## अर्थनिर्वचन

### कोष्टक १

| अ. न | प्रश्न | शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र. १. | | | | | शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र.२. | | | | | शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र. ३. | | | | | शिक्षणशास्त्र महाविद्यालय क्र. ४. | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | होय | % | नाही | % | एकूण | होय | % | नाही | % | एकूण | होय | % | नाही | % | एकूण | होय | % | नाही | % |
| १ | संस्थेचे नियम | १० | ८ | ८० | २ | २० | ५ | ३ | ६० | २ | ४० | ८ | ७ | ८७. | १ | १२.५ | ७ | ६ | ८५. | १ | १४. २८ |
| २ | उपक्रम राबवितानाचे स्वातंत्र्य | १० | ७ | ७० | ३ | ३० | ५ | २ | ४० | ३ | ६० | ८ | २ | २५ | ६ | ७५ | ७ | . | ०० | ७ | १०० |
| ३ | राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंध | १० | ९ | ९० | १ | १० | ५ | ४ | ८० | १ | २० | ८ | १ | १२.५ | ७ | ८७.५ | ७ | . | ०० | ७ | १०० |
| ४ | संशोधन मार्गदर्शन आणि विस्तारसेवा उपलब्धता | १० | १० | १०० | ० | ० | ५ | ४ | ८० | १ | २० | ८ | ० | ० | ८ | १०० | ७ | . | ०० | ७ | १०० |
| ५ | गुणवत्ता यादीतील विद्यार्थी | १० | ८ | ८० | २ | २० | ५ | ४ | ८० | १ | २० | ८ | ० | ० | ८ | १०० | ७ | . | ०० | ७ | १०० |
| ६ | कार्यभार व मणुष्यबळ | १० | ७ | ७० | ३ | ३० | ५ | ४ | ८० | १ | २० | ८ | १ | १२.५ | ७ | ८७.५ | ७ | . | ०० | ७ | १०० |
| ७ | संगणक व इंटरनेट सुविधा | १० | ९ | ९० | १ | १० | ५ | ५ | १०० | ० | ०० | ८ | १ | १२.५ | ७ | ८७.५ | ७ | . | ०० | ७ | १०० |
| ८ | इंटरनेटचा उपयोग | १० | ७ | ७० | ३ | ३० | ५ | ४ | ८० | १ | २० | ८ | १ | १२.५ | ७ | ८७.५ | ७ | १ | १४.२८ | ६ | ८५.७१ |
| ९ | महाविद्यालयासाठी पुरेशी उपलब्ध जागा | १० | ९ | ९० | १ | १० | ५ | ४ | ८० | १ | २० | ८ | ३ | ३७.५ | ५ | ६२.५ | ७ | १ | १४.२८ | ६ | ८५.७१ |
| १० | Placement cell ची उपलब्धता व कार्यवाही. | १० | ४ | ४० | ६ | ६० | ५ | ३ | ६० | २ | ४० | ८ | ० | ० | ८ | १०० | ७ | . | ०० | ७ | १०० |

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## निष्कर्ष

१. बी.एड्चा अभ्यासक्रम राबविताना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालय व विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालय संस्थेच्या नियमावलीमध्ये फरक दिसून आला.
२. अभ्यासक्रम पूरक उपक्रम राबविताना शिक्षकांना पूर्ण स्वातंत्र्य मिळत नाही.
३. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संस्थांशी विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा संबंध खूप कमी प्रमाणात येतो.
४. संशोधन मार्गदर्शनाच्या सुविधा अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या तुलनेत विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात उपलब्ध नाही.
५. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या तुलनेत विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील येणारे विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी आहे.
६. कार्यभार व मणुष्यबळ यांचे प्रमाण अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या तुलनेत विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात व्यस्त आहे.
७. इटरनेट सुविधा व त्याचा अध्यापनात उपयोग याबाबत विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात वापर दिसून येत नाही.
८. अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या तुलनेत विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नोकरी सेवा सुविधा पुरविल्या जात नाही असे दिसून आले.

संदर्भग्रंथ सूची

१. मुळे रा.श., उमाठे,वि.तु.,(१९८७) 'शैक्षणिक संशोधन पद्धती' (तृतीयावृत्ती), औरंगाबाद, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ, औरंगाबाद.
२. भिंताडे, वि.रा., (२००४) 'शैक्षणिक संशोधन पद्धती' (प्रथमावृत्ती) पुणे, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
3. Aggarwal J. C., (1995), "*Development and Planning of Moden Education*", Vikas Publishing House Pvt. Ltd.
4. Best John W., Kahn James V., (1992), "*Research in Education*", Prentice Hall of India, Private Hed. New Delhi-110001 .
5. Buch M. B., (1988-92), "*Fifth Survey of Research in Education, National Council of Educational Research and Training*", New Delhi.